## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परकीय भाषा विभाग

**परकीय भाषा विभाग सन २०२५-२६ करिता खालील परकीय भाषांचे**

**अर्धवेळ अभ्यासक्रम जाहीर करत आहे.**

***फ्रेंच, जर्मन, जपानी, रशियन, स्पॅनिश***

<u>अभ्यासक्रम</u> :

१. Foundation Course Fast Track - Level 1 ***फ्रेंच, जर्मन, जपानी, रशियन, स्पॅनिश***
   (पूर्वीचे इन्टेन्सिव्ह सर्टिफिकेट कोर्स)
२. Foundation Course Fast Track - Level 2 ***फ्रेंच, जर्मन, जपानी***
   (पूर्वीचे इन्टेन्सिव्ह डिप्लोमा कोर्स)

अभ्यासक्रम कालावधी : प्रत्येकी एकूण 180 तास (प्रत्यक्ष किंवा ऑनलाइन अध्यापन)

अध्यापन ५ जानेवारी ते ८ मे २०२६ आठवड्यातून ५ दिवस, रोज २ तास या प्रमाणे ; परीक्षा मे २०२६ मध्ये होईल. ती मात्र ऑनलाइन होणार नाही, सर्वांनाच परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर यावे लागेल.

<u>तुकड्या</u> :

- या वर्षी अभ्यासक्रमांच्या काही तुकड्यांना ऑनलाइन पद्धतीने शिकवले जाईल, तर काही तुकड्या परकीय भाषा विभाग, पुणे ४ येथे नेहमीप्रमाणे प्रत्यक्ष वर्गात भरतील. ऑनलाइन पद्धतीसाठी अर्थातच लॅपटॉप / डेस्कटॉप – त्याला कॅमेरा जोडलेला, चांगल्या दर्जाची आंतरजालीय जोडणी तुमच्याकडे असणे अपेक्षित आहे.
- गुणवत्ता यादी शैक्षणिक गुणवतेनुसार तसेच सामाजिक आरक्षणाचे सर्व नियम पाळून तयार होतील.
- अर्ज भरताना बॅचेसचे दोन प्राधान्यक्रम द्यायचे असतात. शक्यतोवर तुमच्या पहिल्या, जागा भरल्यास दुसऱ्या पसंतीची बॅच द्यायचा आमचा प्रयत्न असतो.
- नव्याने एखादी भाषा शिकू इच्छिणाऱ्यांनी म्हणजे Level 1 अभ्यासक्रमांसाठी अर्ज भरताना पर्यायी भाषेची पसंती निवडून ठेवायची असते. जर जागा संपल्याने तुमचे नाव गुणवत्ता यादीत येऊ शकले नाही तर तुम्हाला पर्यायी भाषेबाबत इमेल पाठवून पुन्हा एकदा तुमची संमती घेऊन त्या दुसऱ्या भाषेसाठी तुम्हाला प्रवेश देण्यात येईल. अशा वेळी नव्याने वेगळे प्रवेश शुल्क आकारले जात नाही.

**<u>वि. सू.</u> : जर तुम्ही २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात एक पूर्ण वेळ अभ्यासक्रम आणि एखादा वर्षभर चालणारा परकीय भाषेचा अर्धवेळ अभ्यासक्रम यांना नाव नोंदले असेल तर तुम्हाला या साडेचार महिन्यांच्या तिसऱ्या एका अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येणार नाही. मात्र जुलै ते डिसेंबर २०२५ या कालावधीत जे फ्रेंच, जर्मन किंवा जपानी भाषेचा Level 1चा अभ्यासक्रम करत असतील, त्यांना त्या भाषेच्या Level 2साठी अर्ज करता येईल.**

## शैक्षणिक अर्हता

- ❖ नव्याने शिकणाऱ्यांसाठी - Level 1 – कोणत्याही शिक्षण मंडळाची दहावी उत्तीर्ण.
- ❖ Level 2 या अभ्यासक्रमांसाठी सा.फु.पु.वि. चा Level 1 किंवा पूर्वीचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम / जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम
- ❖ Level 2 साठी समकक्ष अर्हतेच्या आधारे अर्ज करणाऱ्यांना प्रवेश परीक्षा द्यावी लागेल. त्यांना त्याबाबत स्वतंत्र इमेल पाठवू. अर्ज भरण्याची प्रक्रिया ही पहिली पायरी सर्वांनीच केली पाहिजे.
- ❖ समकक्ष परीक्षांची माहिती त्या त्या भाषेअंतर्गत पाहून घ्यावी
- ❖ वि.सू. – अर्ज भरताना सुरुवातीला वैयक्तिक माहितीचा भाग विद्यापीठाच्या सर्वच पूर्णवेळ / अर्धवेळ अभ्यासक्रमांना समान असतो. तेथे तुम्ही आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या अभ्यासक्रमाचा उल्लेख करून ठेवलेला असला पाहिजे. मग विशिष्ट अभ्यासक्रमासाठी अर्ज भरताना शैक्षणिक अर्हतेचा तो पर्याय तुम्हाला निवडीसाठी उपलब्ध होईल.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न कोणत्याही महाविद्यालयात किंवा विद्यापीठाच्याच विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना Level 1, 2 व 3 पैकी कोणताही अभ्यासक्रम पूर्ण केल्यास जास्तीचे 12 क्रेडिट्स मिळतील व Level 4चा कोणताही अभ्यासक्रम पूर्ण केल्यास जास्तीचे 8 क्रेडिट्स मिळतील.**

## महत्त्वाच्या तारखा

| | From | To |
|---|---|---|
| प्रवेश अर्ज सा. फु. पु. वि. CCEP वर उपलब्ध | १७ नोव्हेंबर २०२५ | ७ डिसेंबर २०२५ |
| (विलंब शुल्कासहित) | ८ डिसेंबर २०२५ | १५ डिसेंबर २०२५ |
| पहिली गुणवत्ता यादी | २० डिसेंबर २०२५ (सायं ६ वा) | |
| पहिल्या यादीतील उमेदवारांनी शिक्षण शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे | २० डिसेंबर २०२५ | २५ डिसेंबर २०२५ |
| दुसरी गुणवत्ता यादी | २७ डिसेंबर २०२५ | |
| दुसऱ्या यादीतील उमेदवारांनी शिक्षण शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे | २७ डिसेंबर २०२५ | ३० डिसेंबर २०२५ |
| तिसरी गुणवत्ता यादी (जागा व प्रतीक्षा यादी असल्यास) | २ जानेवारी २०२६ | |
| तिसऱ्या यादीतील उमेदवारांनी शिक्षण शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे | २ जानेवारी २०२६ | ४ जानेवारी २०२६ |

पर्यायी भाषा देऊ करण्याच्या परिस्थितीत दि ४ **जानेवारी २०२६** रोजी संपर्क केला जाईल.

२०२५-२६ मधील शुल्काचा तपशील **सर्व भाषांच्या अभ्यासक्रमांसाठी स्तरनिहाय व अधिवासनिहाय**

1. प्रवेश अर्ज शुल्क : खुला गट Rs 800/- आरक्षित गट Rs 600/- प्रत्येक अभ्यासक्रमासाठी. पुढे प्रवेश न घेतल्यास परतावा मिळणार नाही. विलंब शुल्क अनुक्रमे Rs 950/- Rs 750/-

2. एकापेक्षा अधिक भाषा / त्याच भाषेचा वर्षभराचा अथवा साडेचार महिन्यांच्या अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी स्वतंत्र अर्ज तयार करणे व त्याचे प्रवेश शुल्क भरणे शक्य असते. मात्र एकापेक्षा अधिक गुणवत्ता याद्यांमध्ये नाव लागले तरीही प्रवेश कोणत्यातरी एकाच अर्धवेळ अभ्यासक्रमाला घेता येतो. इतर अर्जांचे प्रवेश शुल्क परत मिळत नाही.

3. अभ्यासक्रम शुल्क –

**वि. सू. - हे अर्धवेळ अभ्यासक्रम ऐच्छिक आहेत व त्यास कोणतीही शुल्क सवलत लागू होत नाही.**

| **New Name** | **Foundation Course Fast Track Level 1** | **Foundation Course Fast Track Level 2** |
|---|---|---|
| **Old Name** | **Intensive Certificate** | **Intensive Diploma** |
| Tuition fee | **6500** * | **9035** * |
| Admission Fee | 50 | 50 |
| Computerization Fee | 100 | 100 |
| Corpus Fund | 4 | 4 |
| Development Fee | 125 | 125 |
| Disaster Management Fund | 20 | 20 |
| Registration Fee | 75 | 75 |
| Student Activities | 1000 | 1000 |
| Student AID Fund | 10 | 10 |
| Student Safety Insurance | 20 | 20 |
| Student Welfare | 120 | 120 |
| **Total Fees** | **8024** | **10559** |

* महाराष्ट्र अधिवास नसेल तर शैक्षणिक शुल्क (Tuition Fees) दुप्पट, इतर शुल्क तेच. परदेशी नागरिकांसाठी शैक्षणिक शुल्क (Tuition Fees) तिप्पट, इतर शुल्क तेच.

भाषावार अर्हता व तुकड्या

**वि. सू. - सामाजिक आरक्षण लागू केल्यानंतर**

(i) सर्व भाषांतील इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी मूलभूत अर्हताधारकांसाठी ७० टक्के तर समकक्ष अर्हताधारकांसाठी ३० टक्के जागा राखीव. जर यापेक्षा वेगळे प्रमाण असेल तर त्याचा उल्लेख त्या त्या भाषेअंतर्गत केला आहे.

(ii) कृपया आपले **नेमके गुण** लिहावेत, गुणवत्ता यादी त्यावर आधारित असेल. केवळ श्रेणी लिहिणे गुणवत्ता यादी करण्यासाठी पुरेसे नाही.

(iii) Level 2साठीचे जे उमेदवार इतरत्र शिकून समकक्ष अर्हतेनुसार प्रवेश घेऊ इच्छितात त्यांना प्रवेश परीक्षा द्यावी लागेल. ती ऑफलाइन पद्धतीनेही होऊ शकेल. तपशील स्वतंत्रपणे त्या त्या उमेदवारांना कळवला जाईल.

## जपानी भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| Foundation Course in Japanese Fast Track Level 1 | **मूलभूत अर्हता :** SSC [राज्य सरकार, केंद्र सरकार अथवा IB यांची इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण] |
| Foundation Course in Japanese Fast Track Level 2<br>SSC + १, २, ३, ४ वा ५ पैकी कोणतेही एक | **मूलभूत अर्हता :** १. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची जपानी भाषेचा Foundation Course in Japanese Level 1 उत्तीर्ण<br>२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची जपानी भाषेच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा 2023 किंवा 2024 मध्ये उत्तीर्ण.<br>३. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची जपानी भाषेच्या जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा 2023 किंवा 2024 मध्ये उत्तीर्ण. |
| | **समकक्ष अर्हता :** ४. JLPT Level 5 (Yonkyu) ह्या परीक्षेत किमान ७५ %<br>५. JLPT Level 4 (Sankyu) ही परीक्षा उत्तीर्ण. |

| २०२५-२६साठी जपानी भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुकडी | वार | प्रहर | वेळ | केंद्र | विद्यार्थी संख्या |
| Foundation Course in Japanese - Fast Track - Level 1 (एकूण जागा : १००) | | | | | |
| JIC 3 | सोम ते शुक्र | सकाळ | ७.३० ते ९.३० | परकीय भाषा विभाग | पन्नास |
| JIC 4 | सोम ते शुक्र | सकाळ | ७.३० ते ९.३० | ऑनलाइन | पन्नास |
| Foundation Course in Japanese - Fast Track - Level 2 (एकूण जागा : ५०) | | | | | |
| JID 2 | सोम ते शुक्र | सकाळ | ७.३० ते ९.३० | परकीय भाषा विभाग | पन्नास |

## स्पॅनिश भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| Foundation Course in Spanish Level 1 / Foundation Course Fast Track in Spanish Level 1 | **मूलभूत अर्हता :** SSC [राज्य सरकार, केंद्र सरकार अथवा IB यांची इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण] |

| २०२५-२६साठी स्पॅनिश भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुकडी | वार | प्रहर | वेळ | केंद्र | विद्यार्थी संख्या |
| Foundation Course Fast Track in Spanish Level 1 (एकूण जागा ५०) | | | | | |
| SIC 2 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |

## फ्रेंच भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| Foundation Course in French Fast Track Level 1 | **मूलभूत अर्हता :** SSC [राज्य सरकार, केंद्र सरकार अथवा IB यांची इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण] |
| Foundation Course in French Fast Track Level 2<br>SSC + १, २, ३ वा ४ पैकी कोणतेही एक | **मूलभूत अर्हता :** (७० टक्के जागा)<br>१. **सा. फु. पु.वि.चा** Foundation Course in French **किंवा** Fast Track Level 1 उत्तीर्ण<br>२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची फ्रेंच भाषेच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा 2023 किंवा 2024 मध्ये उत्तीर्ण.<br>३. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची फ्रेंच भाषेच्या जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा 2023 किंवा 2024 मध्ये उत्तीर्ण. |
| | **समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा)<br>४. DELF A1 ही Common European Framework of Reference for Languages (French) परीक्षा **उत्तीर्ण** |

| २०२५-२६ साठी फ्रेंच भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **तुकडी** | **वार** | **प्रहर** | **वेळ** | **केंद्र** | **विद्यार्थी संख्या** |
| Foundation Course -Fast track - in French Level 1 (एकूण जागा : १२०) | | | | | |
| FIC 4 | सोम ते शुक्र | सकाळ | ८.३० ते १०.३० | ऑनलाइन | चाळीस |
| FIC 5 | सोम ते शुक्र | दुपार | ४ ते ६ | परकीय भाषा विभाग | चाळीस |
| FIC 6 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | ऑनलाइन | चाळीस |
| Foundation Course Fast Track in French Level 2 (एकूण जागा : ८०) | | | | | |
| FID 3 | सोम ते शुक्र | सकाळ | ८.३० ते १०.३० | ऑनलाइन | चाळीस |
| FID 4 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | ऑनलाइन | चाळीस |

## रशियन भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| Foundation Course in Russian LEVEL 1/ Foundation Course in Russian Fast Track LEVEL 1 | मूलभूत अर्हता : SSC [राज्य सरकार, केंद्र सरकार अथवा IB यांची इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण] |

| २०२५-२६साठी रशियन भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **तुकडी** | **वार** | **प्रहर** | **वेळ** | **केंद्र** | **विद्यार्थी संख्या** |
| **Foundation Course in Russian Fast Track LEVEL 1** (एकूण जागा : २५) | | | | | |
| RIC 1 | बुध ते रवि | सकाळ | ८ ते १० | बुध, गुरु, शुक्र ऑनलाइन व शनि, रवि ऑफलाइन | पंचवीस |

## जर्मन भाषेसाठी शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| Foundation Course in German Fast Track Level 1 | **मूलभूत अर्हता :** SSC [राज्य सरकार, केंद्र सरकार अथवा IB यांची इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण] |
| Foundation Course in German Fast Track Level 2<br><br>SSC + १, ते ६ पैकी कोणतेही एक | **मूलभूत अर्हता :** (७० टक्के जागा)<br>१. **सा. फु. पु.वि.चा** Foundation Course in German **किंवा** Fast Track Level 1 उत्तीर्ण<br>२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची जर्मन भाषेच्या प्रमाणपत्र / जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची परीक्षा 2023 किंवा 2024 मध्ये उत्तीर्ण.<br>**समकक्ष अर्हता :** (३० टक्के जागा) खालीलपैकी कोणतेही एक -<br>३. बारावीला जर्मन भाषेत १०० गुणांच्या परीक्षेत किमान ७० गुण<br>४. कला / वाणिज्य विद्याशाखेच्या प्रथम वर्षात जर्मन भाषेत नवशिक्या किंवा प्रगत स्तरावर किमान ७० %.<br>५. मान्यताप्राप्त संस्थेत जर्मन भाषेचे १८० तासांचे शिक्षण, त्याच्या परीक्षेत किमान ८० %<br>६. GI / MMB ची A2 स्तराच्या परीक्षेत किमान ८० % (‘Gut’ श्रेणी). |

| २०२५-२६ साठी जर्मन भाषेच्या तुकड्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **तुकडी** | **वार** | **प्रहर** | **वेळ** | **केंद्र** | **विद्यार्थी संख्या** |
| Foundation Course in German Fast Track LEVEL 1(**एकूण जागा** - ३००) | | | | | |
| GIC 7 | सोम ते शुक्र | सकाळ | ८.३० ते १०.३० | ऑनलाइन | 50 |
| GIC 8 | सोम ते शुक्र | दुपार | ४ ते ६ | परकीय भाषा विभाग | 50 |
| GIC 9 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग | 50 |
| GIC 10 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | ऑनलाइन | 50 |
| GIC 11 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | ऑनलाइन | 50 |
| GIC 12 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | ऑनलाइन | 50 |
| Foundation Course in German Fast Track LEVEL 2 (**एकूण जागा** - १००) | | | | | |
| GID 3 | सोम ते शुक्र | सकाळ | ८.३० ते १०.३० | Online | 50 |
| GID 4 | सोम ते शुक्र | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग | 50 |

# <u>सूचना</u>

## सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार तसेच सामाजिक आरक्षणाचे नियम पाळून होतील.

**प्रवेशाची प्रक्रिया -**

1. प्रथम https://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx या संकेतस्थळावर जावे. परकीय भाषा विभागाच्या अर्धवेळ अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रियाही आता येथूनच होईल.
2. CCEP वर तपशीलवार User Manual आहे. ते वाचा व तुमचे खाते नसेल तर आधी निर्माण करावे.
3. जर तुम्ही गेल्या वर्षी परकीय भाषेच्या एखाद्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला असेल किंवा गेल्या किंवा या वर्षी दुस-या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी खाते उघडले असेल तर त्याच नावाने पुन्हा त्यात प्रवेश करावा (Log in).
4. सुरुवातीला वैयक्तिक माहितीचा भाग विद्यापीठाच्या सर्वच पूर्णवेळ / अर्धवेळ अभ्यासक्रमांना समान असतो. तेथे तुम्ही आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या अभ्यासक्रमाचा उल्लेख करून ठेवलेला असला पाहिजे. मग विशिष्ट अभ्यासक्रमासाठी अर्ज भरताना शैक्षणिक अर्हतेचा तो पर्याय तुम्हाला निवडीसाठी उपलब्ध होईल.
5. सर्व प्राथमिक माहिती नोंदवल्यानंतर विशिष्ट अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी Apply for Course यावर टिचकी मारावी. तुम्हाला काही पर्याय दिसतील. त्यातील ALL किंवा Humanities निवडा. तेथे वरती Diploma and Certificate Courses हा मजकूर दिसेल. त्याच्याशेजारचे बटन निवडा. एवढे केल्यावर तुम्हाला परकीय भाषा विभागाचे सर्व अभ्यासक्रम दिसू शकतील. तुम्हाला पाहिजे तो अभ्यासक्रम निवडा.
6. अर्जाचे शुल्क भरेपर्यंत तुम्हाला तुमच्या अर्जातील तपशील बदलता येईल. एकदा अर्जाचे शुल्क भरले की अर्जात कोणताही बदल करता येणार नाही तसेच त्याच अभ्यासक्रमासाठी आणखी एक अर्जही भरता येणार नाही.
7. अर्जाचे शुल्क ऑनलाइन भरायचे आहे. त्यानंतर तुम्हाला <u>print</u> हा पर्याय दिसेल. अर्ज आपल्या संगणकावर उतरवून ठेवा व छापून ठेवा. अर्जाची तीन पाने असतील. अर्ज, कबुलीनामा, व पैसे मिळाल्याची पोच - अशी एकूण ३ पाने असतील. पोचपावतीवर तुमचा अर्ज क्रमांकही असेल.
8. नव्याने एखादी भाषा शिकू इच्छिणा-यांनो, तुम्ही एकापेक्षा अधिक भाषांच्या अभ्यासक्रमांसाठी किंवा एकाच भाषेच्या प्रमाणपत्र आणि जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी अर्ज करून ठेवू इच्छित असल्यास प्रत्येक अभ्यासक्रमासाठी नव्याने चलन निर्माण करून प्रत्येकी ८०० (किंवा ६००) रुपये भरावे लागतील. तुमचे नाव एकापेक्षा जास्त अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता यादीत आले तरी **प्रवेश कोणत्यातरी एकाच अभ्यासक्रमाला घेता येईल**. इतर अभ्यासक्रमांच्या अर्जाचे शुल्क परत मिळणार नाही.
9. जर एखाद्या प्रमाणपत्र / जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला खूप जास्त अर्ज आले तर आम्ही तुम्हाला जिथे जागा असेल अशा दुसऱ्या एखाद्या भाषेचा पर्याय देऊ. त्यासाठी वेगळे अर्जाचे शुल्क भरावे लागणार नाही. अर्ज भरताना पर्यायी भाषा जरूर निवडून ठेवा. त्या संबंधीची मेल तिसऱ्या गुणवत्ता यादीतही नाव न लागणाऱ्यांना पाठवण्यात येईल.
10. अर्ज करणे ही पहिली पायरी. गुणवत्ता यादीत नाव लागल्यावर विहित वेळेत शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे.
11. सर्व गुणवत्ता याद्या परकीय भाषा विभाग तसेच https://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx आणि परकीय भाषा विभागाचे पान http://unipune.ac.in/dept/fine_arts/foreign_languages/default.htm येथे उपलब्ध होतील.